# शिवसेनेच्या हाती विश्वासाने पालिका दिली

# पण आता मराठी माणसांनाच बेरोजगार करणार का?

**संपादकीय**

**सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
**सादर करीत आहेत**

बृहन्मुंबई महानगरपालिका ही महाराष्ट्राची अत्यंत श्रीमंत महापालिका आहे. मुंबईतील तमाम मराठी माणसांनी मोठ्या विश्वासाने वर्षानुवर्षे या पालिकेच्या चाव्या शिवसेनेच्या हाती दिल्या आहेत. शिवसेनेच्या प्रतिकूल काळातही मुंबईकरांनी शिवसेनेची साथ सोडली नाही. सर्व तर्कवितर्क खोटे ठरवत शिवसेनेलाच पालिकेवर विराजमान केले. मुंबईकरांनी शिवसेनेला सतत जो पाठिंबा दिला आहे त्यामागे एकच प्रबळ भावना आहे की, जोपर्यंत मुंबईत शिवसेना आहे तोपर्यंत कुणीही मराठी माणसाला हात लावू शकणार नाही. मराठी माणूस मुंबईत टिकवायचा असेल तर मुंबईत शिवसेनेचीच ताकद हवी. शिवसेना या विश्वासाला पात्र ठरली होती. म्हणून लाखो मुंबईकर आजही आम्ही बाळासाहेबांचे निष्ठावंत असे छाती फुगवून सांगतात.

पण आता मुंबई महापालिकाच मराठी माणसांच्या रोजगारावर हातोडे मारून मराठी माणसाला देशोधडीला लावते की काय अशी भीती पसरू लागली आहे. महापालिकेच्या अखत्यारित असलेल्या छोट्या-मोठ्या योजनांतून मराठी माणसाला कामे मिळतात. त्यांच्या हातात आणि पर्यायाने त्यांच्या कुटुंबात चार पैसे खेळतात. मात्र आता ही कामे मराठी माणसांच्या हातून काढून घेऊन मोठ्या कंपन्यांना ही कामे देण्याचा सपाटाच सुरू झाला आहे. यामुळे मराठी माणूस कावराबावरा होत आहे. त्याने कुणाकडे दाद मागायची?

मुंबईतील महापालिका शाळांमध्ये मध्यान्ह आहार देण्याचे काम आजपर्यंत महिला बचत गटांकडे होते. ३५० महिला बचत गट हे काम करीत होते. इतकी वर्षे अत्यंत जबाबदारीने आणि मन लावून महिलांनी हे काम केले. आता मात्र अचानक आंतरराष्ट्रीय इस्कॉन आणि गुजरातच्या अक्षय पात्र संस्थेला हे काम देण्याचा निर्णय झाला आहे. हा निर्णय का घेतला याची कारणेही बचत गटांना दिली नाहीत. ३५० महिला बचत गट म्हणजे हजारो मराठी कुटुंबे त्यात गुंतलेली असतात. पालिकेच्या या एका निर्णयाने या सर्व कुटुंबांवर गदा येणार आहे. आपले काम वाचावे म्हणून या महिला आता न्याय मिळविण्यासाठी दारोदार भटकत आहेत.

अगदी वेळ आलीच तर संतप्त होऊन त्या आंदोलन करतील. पण भगवा झेंडा खांद्यावर घेतल्यानंतर त्यांच्यावर ही वेळ का यावी?

महिला बचत गटांवर जे संकट आले आहे तसेच संकट दत्तक वस्ती संस्थांवर आले आहे. मुंबईच्या झोपडपट्टीत राहणाऱ्यांनीच दत्तक वस्ती संस्था स्थापन केल्या आणि झोपडपट्टी सफाईची जबाबदारी स्वत:वर घेतली. २००१ साली संस्थेला कर्मचाऱ्यामागे केवळ ९०० रुपये अनुदान मिळत होते. इतक्या तुटपुंज्या रकमेत झोपडपट्टीची स्वच्छता सुरू होती. झोपडीवासीयांना स्वच्छतेबद्दल जागरूक करण्यापासून या संस्था झटत राहिल्या. या ५३० दत्तक वस्ती संस्थांमुळे झोपडपट्ट्या स्वच्छ राहत आहेत.

मात्र आता या संस्थांच्या हाताचे काम काढून घेण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. जागतिक निविदा काढून कंपन्यांना हे कंत्राट देण्याचा घाट घातला आहे. त्यासाठी पहिली पायरी म्हणजे ज्या दत्तक वस्ती संस्थेबद्दल तक्रारी येतील त्यांचे काम बंद केले जात आहे. स्थानिक नगरसेवकच या तक्रारी देतात. कारण एक संस्था बंद झाली की त्या जागी 'मुंबई प्रबोधन अभियान' या नावाच्या योजनेखाली जी नवी संस्था नेमली जाणार आहे, ती स्थानिक नगरसेवकाच्या शिफारसीने नेमली जाईल, अशी अट घातली आहे. या अटीमुळे नगरसेवक किती वेगाने कार्यरत दत्तक वस्ती संस्थांविरुद्ध तक्रारी करतील, हे वेगळे सांगायला नको.

महिला बचत गटांचे काम काढून घेण्यासाठी त्यांच्या अन्नपुरवठ्याबाबत अपप्रचार सुरू केला आहे. दत्तक वस्ती संस्थांच्या हातून काम काढून घेण्यासाठी त्यांच्याही बाबतीत अपप्रचार सुरू आहे. सर्वच बचत गट आणि प्रत्येक दत्तक वस्ती संस्था उत्तमच काम करते, असा दावा नाही. पण गेली बारा-पंधरा वर्षे सातत्याने काम केल्यावरही ज्यांच्याबाबत गंभीर तक्रारी नव्हत्या त्यांना अपप्रचाराने मारणार का? शिवसेनेने तर निवडणुकीवेळी जे 'करून दाखविले' पुस्तक छापले त्यात दत्तक वस्ती योजनेचे गुणगान आहे.

पालिकेला सुगंधी दूध देण्याचे कंत्राट 'आरे'ला न देता परराज्यातील कंपनीला दिले. मुंबईत बिल्डरांचा हैदोस सुरू असताना नगरसेवक गप्प राहिले. मराठी वस्त्या बुलडोझरखाली उद्ध्वस्त होत आहेत, पण एक डरकाळी ऐकू येत नाही. आता तर पालिकेच्या अखत्यारीत असलेल्या ज्या योजना मराठी माणसांना मिळत होत्या त्याही खालसा करण्याचे काम सुरू आहे. ३५० महिला बचत गट आणि ५३० दत्तक वस्ती संस्थांनी जायचे कुठे? त्यांच्याशी निगडीत जी मराठी माणसे आहेत, त्यांनी करायचे काय?

शिवसेनेचा झेंडा खांद्यावर घेऊन पालिकेवर फडकविला तेव्हा ही सर्व मराठी माणसे निश्चिंत होती. आता आपल्याला कुणी हात लावणार नाही असा त्यांना विश्वास होता. आज हीच माणसे हातचे काम जाण्याच्या भीतीने ग्रासली आहेत. आझाद मैदानात आंदोलन हाच एक पर्याय उरला आहे का? उद्धवजी, पालिकेत जे विपरित चालले आहे ते आम्ही सांगितले. ते रोखण्याचे बळ तुमच्यात आहे. कुणाच्या हातचे काम जाणार नाही याचे आश्वासन द्या आणि मराठी माणसाला निश्चिंत करा.